(9)

# आदिवासी विकास आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन,पहिला मजला, गडकरी चौक, जुना मुंबई-आग्रा रोड, नाशिक -४२२००२

दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७७५१० २५७४२३५, २५७५६१५, २३१७९३८, फॅक्स -२५७९२०८

e-mail- ctdnsk@yahoo.com

महत्वाचे

क्र.केपुयो-२००७/प्र.क्र.१५०/का.६(३)

दिनांक :- १६ नोव्हेंबर,२०११

प्रति,

मा. कुलसचिव,

अमरावती युनिव्हरसीटी,

अमरावती

विषय :- अनुसूचित जाती /जमातीच्या विद्यार्थ्यासाठी केद्रपुरस्कृत बुकबॅक योजना राबविणे....

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यात वैद्यकीय, अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी, पॉलीटेक्नीक, विधी, एमबीए, सीए इत्यादि पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे व्यावसायीक शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यासाठी बुक-बॅक योजना राबविणेसाठी विविध प्रसार माध्यमातून प्रभावीपणे प्रसिध्दी न झाल्यामुळे प्रस्तुत योजना आदिवासी विकास विभागाकडून कार्यान्वीत होऊ शकली नाही. प्रस्तुत योजनेची प्रसिध्दी व अंमलबजावणी राज्य शासनाकडून करणेत न आल्यासबंधी केंद्रशासनाकडील लेखापरिक्षण विभागाकडून दिनांक ११.५.२००७ चे पत्रानुसार परिच्छेद क्र.८.१.२ अन्वये आक्षेपीत मुद्या उपस्थीत केला आहे.

२. तरी प्रस्तुत योजनेसंदर्भात केंद्रशासनाकडील सोबतचे मार्गदर्शक सुचनानुसार आदिवासी विकास विभागामार्फत प्रस्तुत अभ्यासक्रमाचे व्यावसायीक शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यासाठी संबधीत महाविद्यालय स्तरावर बुकबॅक योजना कार्यान्वीत करणेसाठी आपले स्तरावरुन प्रस्तुत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांना तातडीने सुचना देण्यात याव्यात. तसेच केंद्रशासनाकडील मार्गदर्शक सुचनानुसार सोबतचे विहित विवरणपत्रात आवश्यक निधी प्राप्त होणेकरीता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यांचे कार्यालयाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित करावे. जेणेकरुन केंद्रशासनाकडून प्रस्तुत योजनेसाठी केद्र व राज्यशासनाकडून आवश्यक निधी प्राप्त होऊन अनुसूचित जमातीसाठी बुकबॅक योजना कार्यान्वीत होऊ शकेल.

सोबत- केंद्रशासनाकडील दिनांक ११.५.२००७ च पत्र व प्रस्तुत योजनेसंदर्भात मार्गदर्शक सुचना प्रत.

स्थळप्रतीवर आयुक्त महोदय यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करिता

L-57
29.11.11

3294

28 NOV 2011

PA
Pl. discuss

received.
1/12/11